टाटा पॉवरच्या क्लब एनर्जी व भांडुप आणि चांदिवली येथील पवार पब्लिक स्कूलतर्फे बालदिनानिमित्त नैसर्गिक संसाधनांचा वापर आणि वीज बचतीबाबत जनजागृतीपर रॅली काढण्यात आली. दोन्ही शाळांतील २५० विद्यार्थी आणि शिक्षकांनी या रॅलीत सहभाग नोंदवला. पाणीपुरवठा करणाऱ्या नद्या आणि जलस्रोतांच्या संवर्धनाबाबत जागरुक करणे, हा या रॅलीमागील उद्देश होता. विद्यार्थ्यांनी जलप्रदूषण, वायुप्रदूषण रोखा अशा घोषणा देत जागरुक करण्याचा प्रयत्न केला.